Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# मराठी लघुनियतकालिकांची चळवळ: एक आढावा

**प्रा. लहूकुमार खंडाळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
बदनापूर, जि. जालना 431203 (महाराष्ट्र)

लघुनियतकालिक अर्थात लिटल मॅगझीन ही संकल्पनाच मुळात पाश्चात्य राष्ट्राची आहे. एकोणीसाव्या शतकाच्या मध्यात आणि मुख्यतः अमेरिकेत ही संकल्पना प्रामुख्याने उदयास आली. लिटल म्हणजे लहान ते अनेक अर्थाने सांगता येईल. उदा. मॅगझिनचा आकार, त्याची गुंतवणुक, मर्यादित वाचकवर्ग, त्याचे अव्यावसायिक स्वरुप या सर्वच अर्थाने ते लहान म्हणजे लघु नियतकालिक आहे. अमेरिकेत 20 व्या शतकाच्या सुरुवातीला काही प्रस्थापित नियतकालिकाला विरोध करण्यासाठी या लघु नियतकालिकांचा जन्म झाला. आपल्याकडेही अशाच प्रकारची वाङ्‌मय क्षेत्रात काही ठराविक लोकांचीच मक्तेदारी होती. त्यामुळे बहुतांश बहुजनांना किंवा नवोदितांना साहित्यातून अभिव्यक्त होण्यासाठी वेगळे व्यासपीठ नव्हते. मराठी साहित्याच्या इतिहासावर नजर टाकल्यास असे दिसून येते की, त्याकाळी अनेक आघाडीच्या मराठी साहित्यिकांना त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात या दर्जेदार नियतकालिकांनीच घडवले आहे. त्यामध्ये केशवसुत, बालकवी, खांडेकर, मर्ढेकर, माडखोलकर, खानोलकर अशा सर्वच लेखकांची वाङ्‌मयीन वाटचाल अशा नियतकालिकेतूनच झाल्याचे पहावयास मिळते. त्याकाळी दर्जेदार नियतकालिक म्हणून नावारुपाला आलेल्या नियतकालिकांमध्ये प्रामुख्याने, विविध ज्ञानविस्तार, करमणूक, मनोरंजन, सत्यकथा, अभिरुची, शब्द, मराठी ज्ञान प्रसारक ही सर्वच मासिके त्या त्या कालखंडातील अभिव्यक्तीची गरज पूर्ण करतांना दिसतात आणि ते स्वाभाविक आहे.

साहित्याच्या वृध्दीसाठी नियतकालिकांची भूमिका ही अत्यंत महत्वाची असते. म्हणूनच समाजाच्या सांस्कृतिक जडण–घडणीचा विचार करतांना या नियतकालिकांचा आढावा घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर असेही म्हणता येईल की, जेव्हा जेव्हा साहित्याच्या प्रमुख प्रवाहात साचलेपणा येतो, तेव्हा तेव्हा त्या साचेबंद प्रवाहाला वेगळी दिशा देण्याचे काम

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

नियतकालिकांचे असते. त्या त्या काळातील समाजाची वैचारिक व बौध्दीक भूक भागविण्याचे महत्वाचे काम या नियतकालिकानी केले आहे.

आजही साधना, अनुष्टुभ, कविता रती, परिवर्तनाचा वाटसरू, समाज प्रबोधन पत्रिका, प्रतिष्ठान, अंतर्नाद इ. नियतकालिके आपआपल्या पध्दतीने समाजाच्या सेवेशी निष्ठेने वाहिलेले दिसतात. मराठी समाजाचे बौद्धिक, वैचारिक व सामाजिक प्रबोधन करण्याची भूमिका निभावणे हे या काळातील नियतकालिकाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणता येईल. मराठीतील अग्रगण्य असलेल्या विविध ज्ञानविस्तार या मासिकाने सुरुवातीपासून तत्कालीन समाजाची वैचारिक भूक भागविन्याचे महत्वाचे कार्य केले आहे. या नियतकालिकातून अनेक लेखक – कवींनी विविधांगी लेखनाद्वारे मराठी साहित्य, समाज व संस्कृतीला मौलिक असे योगदान दिल्याचे दिसून येईल. मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी मोचनगड ही याच नियतकालिकातून क्रमशः प्रसिध्द झाल्याचे दिसते. या नियतकालिकातून प्रेरणा घेऊन पुढे अनेक नवसाहित्यिक, लेखक, कवींना घडविण्याचे काम नंतरच्या नियतकालिकाने केले आहे. त्यामध्ये मनोरंजन, निबंधमाला, रत्नाकर, करमणूक इ. नियतकालिके जन्माला आल्याचे बघायला मिळते.

करमणूक या मासिकातून मुख्यतः ललित साहित्याला प्रतिष्ठा मिळवून देण्यावर भर दिलेला दिसून येतो. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या आजही याच नियतकालिकातून क्रमशः प्रकाशित झालेल्या दिसतात. ह. ना. आपटे सारख्या साहित्यिक, संपादकांच्या हातून निघालेले हे नियतकालिक अभिरुची संपन्न, विशुध्द वाङ्मयीन व निखळ करमणुकीचे होते. पण लक्षात कोण घेतो, उषःकाल, सूर्योदय, वज्राघात इ. जवळपास अठरा कादंबऱ्या याच नियतकालिकातून प्रसिध्द झाल्याचे आपल्याला बघायला मिळते. करमणूक प्रमाणेच सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्यांचे रंजन, ज्ञान व माहिती यांची अभिरुची घडविण्यासाठी मासिक मनोरंजन निघाल्याचे दिसते. मराठी भाषेत दिवाळी अंकाची परंपरा ही सर्वप्रथम मासिक मनोरंजन ने केल्याचे दिसते.

1909 साली पहिल्यांदा मराठी भाषेतील दिवाळी अंक काढण्याचे काम मासिक मनोरंजनने केले आहे. त्याचबरोबर कादंबरी, कविता याबरोबरच मराठी कथेलाही एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम या मासिकाने केले आहे. त्यानंतर आलेल्या सत्यकथा सारख्या मासिकाने अनेक नव्या जाणिवांनी लिहिणाऱ्या लेखक, कवीला

घडविण्याचे काम केल्याचे पहायला मिळते. यामध्ये दि. पू. चित्रे, आरती प्रभू, डहाके, रजनी परुळेकर यासारख्या नवकवींना वाङ्‌मयीन क्षेत्रात एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले आहे हे विसरुन चालणार नाही. त्यानंतर साठोत्तरी नंतरच्या पिढीतील लेखकाने नव्या बदलाची, नव्या जाणिवांची चित्रणे करण्यास सुरुवात केली व त्याला शब्दरुप देण्याचे काम शब्द, वाचा, अथर्व, ब्र, येरू या नियतकालिकांनी केले आहे. नवनव्या प्रवाहांना व जाणिवांना आपल्या कवेत सामावून घेण्याचे प्रबळ योगदान या काळातील नियतकालिकांनी केले आहे. त्यामध्ये अनुष्ठुभ, अनाघ्रात, परिवर्तनाचा वाटसरु इ. नियतकालिकांचा वाटा खुप मोठा आहे. 1972 साली निघालेल्या घ् अनुष्ठुभ या नियतकालिकाने गेली अनेक वर्ष वाङ्‌मयीन मूल्य जोपासत आपले एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्याचप्रमाणे कविता–रती हे मराठी कवितेसाठी वाहिलेले नियतकालिक अनेक विषयांना हात घालत कवितेसाठी नवनवे विशेषांक काढत आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये पुन्हा एका नियतकालिकाचा उल्लेख करावा लागेल ते म्हणजे अस्मितादर्श होय. ज्यांना कधीच अभिव्यक्त होता आले नाही त्यांच्यासाठी अस्मितादर्श या नियतकालिकाने फार मोलाची कामगिरी केली आहे. एका विशिष्ठ जातीच्या गटाची भाषा हीच अभिव्यक्तीची प्रमाण भाषा आहे असा जो एक रुढ समज होता. त्याला अस्मितादर्श या नियतकालिकातील लेखणाने धक्का दिला आहे. त्याचा परिणाम असा झाला की, जे समाजघटक तथाकथीत प्रमाणभाषेत अभिव्यक्ती करु शकत नव्हते किंवा त्या भाषेशी अपरिचीत असल्याने व्यक्त होण्यासच कचरत असत. त्यांना या अनियतकालिकामुळे एक स्वतःचे व्यासपीठ मिळाले. त्यातुनच एक दणकट अनुभवाची पार्श्वभूमी असलेल्या दलित साहित्याच्या अभिव्यक्तीला जोर मिळाला व त्यातुनच नव्या दमाचे नवलेखक अस्मितादर्शच्या व्यासपीठावरुन पुढे येऊ लागले. या नियतकालिकाने मराठी कवितेत नवे युग आणणारी भ्रमनिराशाग्रस्त, पिचलेल्या, दुभंगलेल्या, हरवलेल्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी नवी कविता वाचकांसमोर आणली.

एकंदरीतच महाराष्ट्रातील नियतकालिकांचा आढावा घेतला तर असे दिसते की, सुरुवातीची नियतकालिके ही विशिष्ट ध्येयातून जन्माला आलेली आहेत. परंतु दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या नियतकालिकांच्या गर्दीमुळे नियतकालिकांचा दर्जा पुढेही असाच दर्जेदार राहिल व त्यांना व्यावसायिक स्वरुप येणार नाही, याची सर्व वाचक, लेखक व संपादक

यांना खबरदारी घ्यावी लागेल एवढे मात्र खरे! याशिवाय गेल्या दशकभरात येऊ घातलेल्या नव्या पिढीकडूनही अशा प्रकारच्या नवनव्या मासिकाचे स्वागत होऊ लागलेले आहे. एकंदरीतच या सर्व नियतकालिकांचा अगदी अल्पावधीतच केलेला हा परिचय नियतकालिकांच्या योगदानाला दुर्लक्षित करण्यासारखा निश्चितच म्हणता येणार नाही असे वाटते. तूर्तास एवढेच धन्यवाद !

संदर्भ :–

1. नव–अनुष्ठुभ–नोव्हे.डिसे. 2011
2. लोकराज्य – जुन–जुलै 2011
3. मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. प्रा. रा. ना. घाटोळे